# पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरीष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, ता.साक्री,जि.धुळे

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर २०२१—२०२२

## अहवाल

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर दत्तकगाव बोपखेल, ता.साक्री,जि.धुळे येथे दि. १९ मार्च २०२२ ते २५ मार्च २०२२ या कालावधीत घेण्यात आले. २०२१—२२ हे स्वातंत्र्य भारतोचे अमृत महोत्सवी वर्ष असल्या कारणाने या वर्षी स्वतंत्र भारताचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी विविध कार्यक्रम व घेऊन साजरे केले जात आहे. याचेच औचित्य साधुन या विशेष हिवाळी शिबीराचे उद्घाटन दि.१९मार्च २०२२ रोजी ऑनररी कॅप्टन मा.सुरेशजी यादवराव देसाले, कासारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणुन कबचौ. उमविचे रासेयो विभागाचे जळगांवचे संचालक डॉ.सचिन नांद्रे तसेच साक्री विधान सभेच्या आमदार मा.ताईसाो. मंजुळाताई गावित, पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मा.दादासाो. एस.व्ही.मराठे, बोपखेल गृप ग्रामपंचायतीच्या सरपंच मा.ताईसाो. श्रीमती सुमित्राताई राऊत, ग्रामसेविका श्रीमती सुनिता अहिरे मॅडम, शासकीय आश्रमशाळा बोपखेलचे मुख्याध्यापक मा.श्री.प्रदिपजी पोतदार, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री.पाच्या गावित, सामाजिक कार्यकर्ते मा. श्री.जितेंद्र कुवर, पोलीस पाटील श्री.प्रविण वळवी तसेच संचालक मा.श्री.नारायण नाना भदाणे तसेच माजी रासेयो संचालक मा.डॉ.राम पेटारे उपस्थित होते. तसेच उद्घाटन शिबीराचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे आभार रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी केले. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ.शिरसाठ, प्रा.कदम, प्रा.राऊत, डॉ.वाय.एस.मोरे, डॉ. बी.सी.मोरे, प्रा.जाधव, श्रीमती ठाकुर,श्री.बोरसे व ग्रामस्थ तसेच विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

उद्घाटनाच्या कार्यक्रम झाल्यावर स्वयसेवकांना शिबीरा संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी एकत्र बोलाविण्यात आले व त्यात शिबीराच्या दैनंदिनी संदर्भात सुचना देण्यात आल्या. त्यात पहाटे ५:०० वाजे पासुन तर रात्री ९:५५ वाजेच्या दिप मालवण पर्यंतच्या दैनंदिनी विषयी माहिती सांगितली. तसेच नियोजित प्रकल्प,कोरोना मुक्त गाव, आरोग्य जनजागृती, श्रमदान, कृषि जन जागृती, व्यसन मुक्ती अभियान, पर्यावरण, स्वच्छ भारत, ग्रामीण विकास, बेटी बचाव—बेटी पढाव. अशा नियोजित प्रकल्पांविषयी स्वयंसेवकांना सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच त्या नंतर सर्व स्वयंसेवकांचे वेगवेगळे गृप तयार करून प्रत्येक गृपला नावे देण्यात आली. व त्या प्रत्येक गृपचा एक लिडर निवडण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित व्हावा यासाठी प्रत्येकाला एकमेंकांशी वागताना व काम करतांना एकमेकांसोबत कसे व्यवहार करावे हे यातून विकसित होईल. व रात्री सामाजिक मंथन वरती चर्चा व दैनंदिनी लिखाना संदर्भात

माहिती देण्यात आली. व त्यांना दररोज दैनंदिनी लिहण्यासाठी सुचनाही करण्यात आल्या व शेवटी प्रार्थना घेऊन दिपमालवन करण्यात आली.

दिनांक २० मार्च २०२२ वार रविवार शिबीराचा दुसरा दिवस सर्व स्वयंसेवकांना पहाटे ५:०० वा.मैदानावर उपस्थित केले. त्यानंतर योग शिक्षक प्रा.नांद्रे यांनी योगा व ध्यानधारना संदर्भात प्रात्यक्षिके करून घेतली. नंतर चहा व नाश्ता देण्यात आला व त्यानंतर लगेचच स्वयंसेवकांना श्रमदानासाठी शासकीय आश्रमशाळा बोपखेलचे पटांगण व जवळपासच्या परीसरातील कचरा,पाला—पाचोळा, प्लॅस्टीक, दगडधोंडे इत्यादी साफसफाईचे काम या श्रमदानात स्वयंसेवकांनी केले. त्यानंतर स्वयंस्वच्छता करून भोजन व विश्रांतीसाठी त्यांना वेळ देण्यात आला. त्या नंतर दुपार सत्रात प्रथमता महाविद्यालयातील प्राध्यापक आणि रासेयो माजी संचालक डॉ.राम पेटारे यांनी रासेयो युवक व युवागीत या विषयावर विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच रासेयोची गीते व राष्ट्रभक्ती गीते त्यांच्याकडून योग्य चालीवर म्हणून घेतली.

त्या नंतर व्याख्यान सत्र सुरू झाले. त्यात दोन व्याख्याने झाली. प्रथम व्याख्यान आमच्या महाविदयालयातील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक के.आर.राउत यांनी कृषि व ग्रामीण विकाससंदर्भात विद्यार्थ्यांसमोर आपले विचाार मांडले. त्यानंतर दुसऱ्या सत्रातील वेळेत महाविद्यालयातील माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करणारी विद्यार्थीनी कु.चंद्रकला गावित हिने ती स्वत: एव्हरेस्ट शिखर कसे सर केले या संदर्भात विद्यार्थ्यांना स्वानुभव कथन केले व स्वयंसेवकांचा उत्साह वाढविला. त्या नंतर चहापान करून सायंकाळी प्रा. चंद्रकांत घरटे व प्रा.प्रदिप सावळे यांनी स्वयंसेवकांना मैदानी खेळासाठी मार्गदर्शन केले. रात्री भोजनानंतर सामाजीक विचार मंथनाच्या वेळेत भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षा संदर्भात विचार मंथन करण्यात आले. त्या नंतर स्वयंसेवकांना दैनंदिनी लिखानासाठी वेळ देण्यात आला शेवटी प्रार्थना झाल्यानंतर दिपमालवण करण्यात आली.

दिनांक २१ मार्च २०२२ रोजी पहाटे ५:०० वाजता बोपखेल गावात स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी प्रभात फेरी काढली. या प्रभात फेरीत वेगवेगळया घोषणा देऊन देऊ जनजागृती करण्यात आली. व त्या नंतर लगेचच योगासने व ध्यान धारणेसाठी स्वयंसेवक मैदानावर उपस्थित झाले. योगा नंतर चहा व नाश्ता केला व लगेचच गावाजवळील जागेवर, स्वयंसेवकांना श्रमदानासाठी नेण्यात आले. त्या जागेवर कोटेरी झुडपे प्लॅस्टीक, दगडधोंडे मोठमोठे खडड्‌ व त्या परीसरातच व्यायामासाठी वेगवेगळे जिम साहित्य लावलेल्या जागेची स्वच्छता करण्यास सुरूवात केली. या श्रमदानानंतर विद्यार्थ्यांना स्वयंस्वच्छता व भोजनासाठी वेळ देण्यात आला. व त्या नंतर एन.एस.एस.गीते स्वयंसेवकांनी उत्स्फुर्तपणे म्हटली. व दुपार सत्राला आरंभ झाला. त्या व्याख्यानात प्रथमता दहिवेल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सुरेश अहिरे यांनी “जल व्यवस्थापन” या विषयावर स्वयंसेवकांना बहुमुल्य माहिती दिली व त्यांचे प्रबोधन घडवुन आणले. तसेच दहिवेल महाविद्यालयाचे प्राणिशास्त्र विभागाचे प्राध्यापक शिवप्रसाद शेवाळेंनी “अंधश्रध्दा निर्मुलनाबाबत” व्याख्यान दिले. त्या नंतर सायंकाळी विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे खेळ शिकविण्यात आले. रात्री भोजन झाल्यावर विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला त्यात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. व त्यानंतर विद्यार्थ्यांनी दैनंदिनी लिखान केले व प्रार्थना झाल्यावर दिपमालवण करण्यात आली. या

दिवसाची जबाबदारी स्वयंसेवकांच्या गृपवर टाकण्यात आली होती. त्यांनी अतिशय सुंदररित्या वेळेचे नियोजन केले होते.

दि.२२ मार्च २०२२ — रासेयो हा विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचा चौथा दिवस नेहमी प्रमाणे पहाटे ५:०० वाजता गावात प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. त्या प्रभात फेरीमध्ये वेगवेगळया देशभक्तीपर आधारीत घोषणा देण्यात आल्या व जनजागृती करण्यात आली. त्यानंतर स्वयंसेकांकडून योगा व ध्यान—धारणा वेळेनुसार चहा व नाश्ता झाल्यावर स्वयंसेवक फावडे,टिकाव,पाटी घेऊन श्रमदानासाठी रवाना झाले. खोदकाम, खडड्े बुजविणे तसेच व्यायामाच्या जागी सपाटीकरण करणे, दगड, माती लांबुन वाहुन आणुन त्यापासुन बांध बांधण्याचे काम स्वयंसेवकांनी केली ही कामे करीत असतांना विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तीने एन.एस.एस. गीते म्हटली. दैनंदिनी प्रमाणे श्रमदानानंतर, स्वयं स्वच्छता, भोजन, विश्रांती झाल्यावर दुपार सत्रासाठी स्वयंसेवक एकत्र आले. व त्यांनी गीतमंचाच्या वेळेत विविध गीते गायिली. व नंतरच्या व्याख्यान सत्रात प्रथमतः प्रा.डॉ.बी.सी.मोरेंनी 'प्राण्यांमधील विज्ञान' या विषयावर सविस्तर व्याख्यान दिले. त्याचा विद्यार्थ्यांना खुप फायदा होईल अशी माहिती त्यांनी दिली. नंतर "स्वातंत्र्योत्तर भारताची स्थिती" व गती या विषयावर व्याख्यान देण्यासाठी पत्रकार भरत बागुल व श्री. किरण घरटे, श्री.अनिल देसले या पत्रकार बंधुंच्या व्याख्यानाचा कार्यक्रम झाला व विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्योत्तर भारताची स्थिती व गती या विषयावर पत्रकार बंधुंनी अतिशय मोलाची माहिती स्वयसेवकांनी दिली. त्या नंतर ग्रामीण रूग्णालय पिंपळनेर येथील ICTC विभागातील समुपदेशक श्री.हेमंत जाधव यांनी "एच.आय.व्ही.एड्स, आणि युवक, अवयव दान व तंबाखुमुक्ती" या संदर्भात स्वयंसेवकांना उपयुक्त माहिती दिली. त्यांच्यामध्ये जागृती घडवून आणली तसेच अनेक स्वयंसेवकांनी एड्स व अवयवदानाबदद्ल विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. त्यानंतर चहा—पान,मैदानी खेळ व गटचर्चाचे आयोजन करण्यात आले. गटचर्चेसाठी वेगवेगळया गटांना वेगवेगळे विषय देण्यात आले होते. उदा.ऑनलाईन शिक्षण फायदयाचे की तोटयाचे, लॉकडाऊनमुळे लोकांच्या मानसिकतेमध्ये मोठा बदल झाला इ. त्यानंतर सायंकाळचे भोजन व रात्री सामाजीक विचार मंथन करण्यात आले. यावेळी आमच्या महाविदयालयातील प्राणिशास्त्र विषयाचे प्रा.डॉ.राम पेटारे यांनी स्वयंसेवकांना रा.से.यो.चे गीते चालीवर म्हणावयास शिकवीली. व विद्यार्थ्यांनी त्यांना उत्फूर्त प्रतिसाद दिला. तर महाविद्यालयातील प्रा.डॉ.संजय खोडके सरांनी देखिल एन.एस.एस.मधुन तरूण कसे घडतात या संदर्भात अभ्यासपुर्ण मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी दैनंदिनी लिखान केले व प्रार्थना झाल्यावर दिपमालवन करण्यात आली.

दिनांक २३ मार्च २०२२ — शिबीराचा पाचवा दिवस शिबीरातील दैनंदिनी प्रमाणे पहाटे ५:०० वाजता उठुन स्वयंसेवकांनी घेऊन बोपखेल गावात प्रभात फेरी काढण्यात आली. त्यात त्यांनर विविध घोषणा देत जन जागृती केली. देशभक्तीवर घोषणा दिल्या. या दिवशी सकाळी बोपखेल गावातीलच प्रतिष्ठीत नागरीक आणि राजे छत्रपती संभाजी इंग्लीश मिडियम स्कुलचे चेअरमन व सामाजिक कार्यकर्ते दादासाो.श्री.संभाजी अहिरराव सरांनी स्वयंसेवकांना कराटे मधुन स्वयंसंरक्षणाचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकाद्वारे दिले.

विद्यार्थ्यीनींनी सक्षम होण्यासाठी कराटेचे शिक्षण घेतलेच पाहिजे असे त्यांनी मार्गदर्शन करतोना नमुद केले.

त्यानंतर चहा व अल्पोपहार झाल्यावर स्वयंसेवक श्रमदानासाठी मैदानाकडे रवाना झाले. पुन्हा ठरविलेल्या जागेवर ते एकत्र आले व श्रमदान करण्यात आले. याच दिवशी आरोग्य जनजागृती संदर्भात आमच्या रासेयो एककामार्फत व व्हिजन चॅरीटेबल ट्रस्ट व व्हि.आर.आय.केअर सेंटर अॅन्ड ऑप्टीकल्स् पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्या वेळी बोपखेल व आजुबाजुच्या पाडयांवरील असंख्य नागरीक या शिबीराचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहिले. जवळपास १९५ नागरीकांनी या शिबीराचा लाभ घेत आपल्या डोळयांच्या आरोग्याची तपासणी करून घेतली. या वेळी रासेयो स्वयंसेवकांनी अतिशय उत्तम प्रकारे आपापली जबाबदारी पार पाडली. नेत्र तपासणी साठी डॉ.राकेश गवळी, डॉ.दिपाली बोर्डे, स्टॉफ सौरभ पाटील, प्रियंका होळकर इ.डॉक्टर उपस्थित होते नागरीकांना व त्यांच्या स्टॉफचे बहुमुल्य सहकार्य लाभले. या वेळी असे निदर्शनास आले की, बहुसंख्य स्त्री—पुरूषांना डोळयांचे नंबर आलेले होते. तर बऱ्याचशा स्त्री पुरूषांना मोती बिंदुच्या ऑपरेशनची गरज आहे असे दिसुन आल्यावर डॉक्टरांनी अशा पेशंन्टस्ना योग्य सल्ला देऊन मार्गदर्शन केले. या शिबीराला खेडया—पाडयांवरून मोठा प्रतिसाद मिळाला हे शिबीर यशस्वी करण्यासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे व रासेयो मधील सर्व स्वयंसेवक यांनी योग्य नियोजन केल्यामुळे शिबीराला मोठा प्रतिसाद मिळाला.

विशेष म्हणजे रासेयो एककाचे अध्यक्ष व रासेयो शिबीराचे आयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे, डॉ.शिरसाठ, डॉ.बी.सी.मोरे, प्रा.तोरवणे इ. सहकार्यांनी भेट देऊन या उपक्रमाबदद्‌ल मोठा आनंद व्यक्त केला. त्यानंतर दुपारच्या सत्रात आमच्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक प्रा.संजय तोरवणे यांनी "कृषि आणि ग्रामिण विकास" या विषयावर स्वयंसेवकांना सखोल मार्गदर्शन केले. नोकरी बरोबरच शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे असे ते म्हणाले या सात दिवशीय शिबीरात दररोज आलेल्या वक्त्याचा परिचय, सुत्रसंचालन, मार्गर्शन, सत्कार या सर्व गोष्टी विद्यार्थी स्वयंसेवक करीत असत हे विशेष करून येथे नमुद करावेसे वाटते.

त्यानंतर पिंपळनेर येथील पत्रकार श्री.विशाल बेनुस्कर यांनी "कोरोना आणि शिक्षण" या विषयावर आपले मत विद्यार्थ्यांसमोर मांडले तसेच श्री.बेनुस्कर व प्रा. तोरवणे, कार्यक्रम अधिकारी यांच्या सोबत श्रमदानासाठी निवडलेल्या जागेवर जाऊन स्वयंसेवकांनी श्रमदानातुन केलेल्या कामाची पाहणी केली व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यानंतर दैनंदिनी नुसार चहापान व मैदानी खेळ व गटचर्चा करण्यात आली. या वेळी महाविद्यालयातील गणित विषयाचे प्राध्यापक के.डी.कदम यांनी विद्यार्थ्यांना बौंध्दीक विकासाच्या दृष्टीने काही खेळ शिकविले आणि एन.एस.एस. चे गीत ही स्वयंसेवकांकडून म्हणवून घेतले. त्यानंतर भोजन व त्यानंतर सामाजिक विचार मंथन,सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले या वेळी स्वयंसेवकांना कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत घरटे, प्रा.सावळे, प्रा.डॉ.पेटारे यांनी मार्गदर्शन केले त्यानंतर प्रार्थना दिपमालवण करण्यात आली.

दिनांक २४ मार्च २०२२ शिबीराचा सहावा दिवस— या दिवशी दैनंदिनी प्रमाणे पहाटे ५:०० वाजता जागर प्रभात फेरी, घोषणा त्यानंतर श्री.संभाजी अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली कराटे प्रशिक्षण स्वयंसेवकांना देण्यात आले. त्या नंतर चहा व अल्पोपहार घेतल्यानंतर सर्व स्वयंसेवक श्रमदानासाठी नियोजित मैदानाकडे रवाना झाले. या दिवशी स्वयंसेवकांनी मोठया प्रमाणावर व स्वयंस्फर्तीने श्रमदान करून एका ओबड—धोबड जागेला सुंदर मैदान स्वरूपात बदल करून दाखविला.त्या ठिकाणी पहाटे व सायंकाळी लहान तसेच तरूण मुले, प्रौढ व्यक्ती व्यायामासाठी आलेले पाहुन स्वयंसेवकांना केलेल्या श्रमाच मनस्वी आनंद होवून त्यांचा श्रमपरिहार झाला व त्याचा स्वयंसेवकांना खुपच आनंद झाला. त्यानंतर स्वयंस्वच्छता—भोजन व विश्रांतीसाठी विद्यार्थ्यांना वेळ देण्यात आला. त्यानंतर दुपार सत्रात प्रभम गीत मंचाच्या कार्यक्रमासाठी स्वयंसेवक एकत्र आले. २४ मार्च हा दिवस क्षयरोग दिवस म्हणुन संपूर्ण जगभर साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधुन कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे, प्रा.प्रदिप सावळे यांनी ग्रामीण रूग्णालय पिंपळनेरचे क्षयरोग निर्मुलन विभागाचे समन्वयक श्री. राजीव पाटील, श्री.जोशी मॅडम व त्यांच्या संपूर्ण स्टॉफला आमंत्रित करण्यात आले. क्षय रोगाची लागण कशी होते? त्याची लक्षणे कोणती, श्री.राजीव पाटील यांनी आपल्या व्याख्यानातून स्वयंसेवकांना आपल्या व्याख्यानातून बहुमुल्य मार्गदर्शन करत त्यावर शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जातात? २०२५ पर्यंत संपुर्ण भारत क्षयमुक्त करण्यासाठी शासन स्तरावर कोणत्या योजना राबविल्या जात आहेत यात ग्रामिण भागातील तरूणांची भुमिका महत्वाची कशी आहे. या संदर्भात त्यांनी स्वयंसेवकांमध्ये जागृती घडवून आणली. तसेच स्वयंसेवकांच्या प्रश्नांचे निराकरणही या वेळी करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खेडया पाडयातील जनता क्षय मुक्त होण्यासाठी एककाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.घरटे, प्रा.सावळे यांनी राजीव पाटील व त्यांच्या स्टॉफला बोलावून ग्रामीण भागापर्यंत शासनाची योजना मोठया प्रमाणावर पोहचवावी म्हणुन हा कार्यक्रम घडवून आणला.

त्यानंतर कुडाशी येथील माजी प्राचार्य व पत्रकार श्री.एस.डी.पाटील सरांनी “विद्यार्थी समुपदेशन” या विषयावर बहुमोल असे मार्गदर्शन स्वयंसेवकांना केले. कोरोना काळातील विद्यार्थ्यांवर येत असलेला ताण कमी करण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजे. अपयश आले तर विद्याथ्यांनी खचून न जाता जगात खुप यशस्वी झालेले व महान बनलेले व्यक्तींना सुध्दा कधिकाळी अपयश आले हाते. तर काहींनी आत्महत्या करावयास निघालेल्या व्यक्तींनी माघारी फिरून जी प्रगती केली ती त्यांना खुप महान बनवुन गेली या संदर्भात अनेक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना आपण अपयशाला घाबरून न जाता खंबीरपणे तोंड देवून पुढे चालत राहिले पाहिजे. माणसाने प्रयत्नवादी असावे पण निराशावादी नसावे. कष्ट करण्याची धमक अंगी ठेवा म्हणजे यश तुमच्या पाठीशी राहिल, असे प्रतिपादन केले. या दुपारच्या सत्राचे आयोजनही रासेयो स्वयंसेवकांनीच केले पाहुण्यांचा परिचय, सत्कार, एन.एस.एस.गीत आभार इ. जबाबदाऱ्या स्वयंसेवकांची अत्यंत चोखपणे पार पाडल्या.

दिनांक २५ मार्च २०२२ हा शिबीराचा शेवटचा दिवस या दिवशी शिबीराचा समारोप होत असतो तरी सुध्दा सर्व स्वयंसेवक नित्यप्रमाणे पहाटे ५:०० वाजता उठुन

तयार होते. प्रथम प्रभात फेरी या वेळेस प्रभात फेरीमध्ये मुलांमध्ये तोच उत्साह दिसुन आला जो पहिल्या दिवशी होता त्या प्रभात फेरीमध्ये वेगवेगळया घोषणा देण्यात आल्या. उदा.'जोडो जोडो, भारत जोडो' 'हम सब एक है' 'जय जवान जय किसान', 'हम भारत की नारी है,फुल नहीं चिंगारी है' बेटी बचाव, बेटी पढाव. इत्यादी घोषणांनी संपुर्ण बोपखेल व परीसर दुमदुमून गेला. कारण तो युवा शक्तीचाच जागर होता. प्रभात फेरी नंतर सर्व स्वयंसेवक पुन्हा मैदानावर कराटे प्रशिक्षणासाठी तयार झाले. आपल्या मार्गदर्शनातुन स्वयंसेवकांना तेव्हा पर्यंत श्री.संभाजी अहिरराव सर हे कराटे प्रशिक्षण देण्यास तयार झाले होते. सरांनी कराटे शिक्षण घेतलेले असेल तर आपला स्वत:चा बचाव करण्यासाठी त्याचा कसा फायदा आपणास होत असतो या विषयी सविस्तर माहिती सांगीतली. विशेषत: मुलींसाठी कराटे प्रशिक्षण घेणे तर आवश्यकच आहे. जर प्रशिक्षण घेतले असेल तर कुणाचीही वाईट नजरेने बघण्याची हिंमत होणार नाही, असे ते म्हणाले. या सत्रानंतर विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला. व लगेचच विद्यार्थी श्रमसंस्कारसाठी रवाना झाले.

या दिवशी विद्यार्थ्यांनी ग्रामसफाई केली. यामध्ये ग्रामपंचायत व पंचायतीच्या जवळील गल्लीचे साफ सफाई केली. त्या ठिकाणी असलेले मंदिर, शिवाजी महाराजांचा पुतळा हे तर मुलांनी स्वच्छ पाण्याने धुवून काढले. गावात साफ सफाईचे काम चालु असतांना ग्रामस्थ सर्व स्वयंसेवकांचे कौतुक करीत होते. जवळ पास तीन तास विद्यार्थी गावात साफ सफाई, ग्राम स्वच्छता करीत होते. त्यांच्या बरोबर कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत घरटे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी ही त्यांना योग्य ते मार्गदर्शन वेळोवेळी करीत चोख अशी कामगीरी विद्यार्थ्यांकडून करून होते. ग्राम सफाई नंतर विद्यार्थी मैदानावर परत आले व त्यांना स्वयंस्वच्छतेसाठी वेळ दिला व लगेचच समारोप कार्यक्रमासाठी तयारी केली. या वर्षी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी सर्व कार्यक्रमांचे नियोजन हे विद्यार्थ्यांनी करावे असे त्यांना आवाहन केले त्यांनी यासाठी पूर्ण मार्गदर्शन विद्यार्थ्यांना रात्री उशिरापर्यंत जागरण करू केले. विद्यार्थ्यांना अगदी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत , परिचय, सत्कारापासुन तर आभारापर्यंत सर्वच कार्यक्रमांची धुरा विद्यार्थी कसे सांभाळतील याचे सर्व नियोजन कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांनी केले.

शिबीराच्या समारोप कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी बोपखेल येथील आश्रमशाळेचे मुख्याध्यापक मा.प्रदिपजी पोतदार हे होते. तर समारोपकर्ते म्हणुन साक्री येथील श्रीमती विमलबाई पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे हे होते. समारोपाच्या भाषणात ते म्हणाले की, खऱ्या अर्थाने आपल्याला माणुस म्हणून घडावयाचे असेल तर कॉलेज मधील प्रत्येक विद्यार्थी हा एन.एस.एस. चा पाईक असला पाहिजे. एन.एस.एस. मध्येच खरा माणुस घडत असतो. या ठिकाणी स्वार्थी प्रवृत्ती नष्ट होऊन निस्वार्थी प्रवृत्ती व परोपकराची भावना अंगी बाणावते. माणसाने स्वताचाच नव्हे तर इतरांचा देखिल विचार करावयास हवा. आपण ज्या समाजामध्ये जन्माला आलो त्या समाजाचे काही देणं लागत असतो. ते या माध्यमातून आपल्याला साध्य करता येते.

त्या नंतर शिबीराचे आयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांनी विद्यार्थ्यांनी या शिबीरात केलेल्या कामाचा आढावा घेत सर्व स्वयंसेवकांचे कौतुक केले.

त्यांनी केलेले हे कौतुक म्हणजेच कार्यक्रम अधिकारी यांनी अतिशय उत्कृष्ठ कामगिरी केल्याची जणु काही पावतीच होती. त्यांच्या भाषणानंतर पिंपळनेर वनविभागाचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर मा.श्री.माळचे साहेब यांनी स्वयंसेवकांना आपल्या मनात उच्च स्वप्न बाळगण्याचे व ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे अहवाहन केले. त्यानंतर छत्रपती राजे संभाजी इंग्लीश मिडीयम स्कुलचे चेअरमन श्री.संभाजी अहिरराव यांनी आपल्या मनोगतातुन विद्यार्थी व विद्यार्थीनीनी बौध्दिक क्षमता वाढवण्या बरोबरच शारिरीक तंदुरूस्तीही तेवढीच महत्वाची आहे. असे मत व्यक्त केले. स्वयंसेवकांनी कराटेचे प्रशिक्षण घेऊन स्वसंरक्षणा विषयी आपला आत्मविश्वास जागरूक ठेवला पाहिजे असं ते म्हणाले. त्या नंतर पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज कमीटीचे चेअरमन मा. भाऊसाो.श्री.धनराजशेठ जैन यांनी स्वयंसेवकांना स्वयंशिस्त बाळगुण विद्यार्थ्यांनी आपला बौध्दिक विकास साधला पाहिजे. असे आपल्या मनोगतातून आपले विचार व्यक्त केले.

रासेयोच्या या शिबीराच्या समारोप कार्यक्रमात अजुन एक विशेष लक्षणिय अशी बाब म्हणजे शैक्षणिक वर्ष २०२१—२२ या वर्षी झालेल्या विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये आमच्या महाविद्यालयाची प्रणिशास्त्र या विषयाची विद्यार्थीनी वैष्णवी बाविस्कर हिने प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळविले. तिचा देखिल सत्कार या शिबीराच्या समारोप कार्यक्रमात घडवून आणला. या विद्यार्थीनीचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.बी.सी.मोरे, प्रा.डॉ.राम पेटारे, प्रा.नांद्रे, डॉ.खोडके, कार्यक्रम अधिकारी चंद्रकांत घरटे,सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रदिप सावळे यांनी सुवर्णपदक पटकाविणाऱ्या वैष्णवीचे विशेष कौतुक केले. या प्रसंगी वैष्णवीचे यजमान व तीच्या आजी देखिल उपस्थित होत्या. रोसेयोच्या विद्यार्थ्यांसमोर मला बोलावून माझा सत्कार केला हे माझे मोठे भाग्य मी समजते असे ती म्हणाली. व आपल्या यशाचे सर्व श्रेय तिने आपल्या गुरूजनांना दिले.

विशेष बाब म्हणजे या कार्यक्रमाला गावातील नागरीकांनी या शिबीराच्या माध्यमातून गावात विविध नवोपक्रम राबविल्यामुळे व गावातील विद्यार्थ्यांमध्ये काही आदर्श निर्माण होतील अशी शिबीरार्थीनी कामगिरी केल्यामुळे नागरीकांनी, आयोजक मा. प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे,रासेयो विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रदिप सावळे यांचा सत्कार केला. व कार्यक्रमात शेवटी प्रार्थना म्हणुन कार्यक्रमाचे आभार व राष्ट्रगीत म्हणुन सांगता झाली. या समारोपाच्या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे सर्व कार्यक्रम विद्यार्थी स्वयंसेवकांनीच नियोजन करून आनंदात पार पाडला.

अशा प्रकारे शिबीरामध्ये रोजच्या दैनंदिन प्रमाणे सर्व काही कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन रासेयो एककाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे, प्रा.नांद्रे यांनी चोखपणे पार पाडले. शिबीरामध्ये

१) ग्राम स्वच्छता व

२) माझे गाव, कोरोना मुक्त गाव

३) पर्यावरण संवर्धन जागजागृती स्वच्छ भारत अभियान

४) ग्रामीण व कृषि विकास

५) तंबाखु, गुटखा मुक्त अभियान

६) श्रमदान

७) आरोग्य जनजागृती अभियान

८) बेटी बचाव बेटी पढाव

९) स्वातंत्र्य भारताचा अमृत महोत्सव

हे शिबीराचे थीम साध्य करण्यावर भर देण्यात आला.

बोपखेल येथील या सात दिवशीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीरात आमचया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच तीन दिवस प्रार्थना, योगासने व प्राणायाम यासाठी प्रा.वाय.एम.नांद्रे तसेच नंतरचे चार दिवस पहाटे ५ वाजेपासुन प्रार्थना कराटे, ध्यान धारना साठीचे प्रशिक्षण श्री.छत्रपती संभाजी इंग्लीश मिडियम स्कुलचे चेअरमन व मार्शल आर्ट कलेचे राष्ट्रीय अध्यक्ष—ब्लॅक बेल्ट प्राप्त खेळाडू श्री. संभाजी अहिरराव यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच शासकीय आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री.प्रदिप पोतदार यांनी स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनींना राहण्याची उत्तम व्यवस्था करून दिली. तसेच तेथील सर्व कर्मचाऱ्यांनी आम्हास उत्तम सहकार्य केले. तसेच बोपखेल गृप ग्रामपंचायत सरपंच श्रीमती सुमित्रा राऊत व ग्रामपंचायत कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र कुवर, माजी ग्रामपंचायत सदस्य श्री.प्रदिपभाऊ अहिरराव, बोपखेल येथील युचा सामाजिक कार्यकर्ते श्री.अंकुश अहिरराव तसेच महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक प्रा. डॉ.राम.पेटारे, प्रा.के.आर.राऊत, डॉ.शिरसाठ, प्रा.कदम, डॉ.वाय.एस.मोरे, डॉ.बी.सी.मोरे, डॉ.नितीन सोनवणे, डॉ.खोडके, प्रा.तोरवणे, प्रा.जाधव, डॉ.खरात, प्रा.वसावे, प्राध्यापकेतर कर्मचारी श्री.सुर्यवंशी भाऊसाहेब, श्री.बोरसे, श्रीमती ठाकुरबाई, श्री.गवळी, श्री.पवार, श्री. संदिप अमृतकर, श्री.शेलार व इतरांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच विद्यार्थी गृप लिडर व स्वयंसेवकांचेही सहकार्य लाभले— अशा रीतीने स्वयंसेवकंना या सात दिवशीय शिबीरात बौध्दिक व शारिरीक शिदोरी मिळाली तिच्यातून उज्वल नागरीक तयार होतील असा विश्वास आम्हाला वाटतो.

**धन्यवाद !!!**

कार्यक्रम अधिकारी प्राचार्य

# * नियमित कार्यक्रम - अहवाल *

११ एप्रिल– कांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंती निमीत्त रासेयो सहा.का. अ.प्रा.पी.एम.सोनवणे व्याख्यान–

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविदयालय पिंपळनेर आणि अंधश्रध्दा निर्मुलन समिती पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आमच्या महाविद्यालयातील रासेयो सहाय्यक कार्यकम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंती निमित्त परिसरात प्रबोधन करण्यासाठी ऑनलाईन व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाला अंनिस चे अध्यक्ष चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकर्ते,विदयार्थी, प्राध्यापक इ.उपस्थित होते.

२) कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथील रासेयो एककाच्या वतीने कोरोना व्हॅक्सिनेशन, सॅनिटायझरच्या वापर सोशियल डिस्टंसिंग, मास्करचा वापर या संदर्भात प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे, सहाय्यक कार्य.अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून वरील कार्यक्रम राबविण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करयासाठी रासेयो चे स्वयंसेवक सागर आघाव (शेणपुर,मलांजन) या ग्रामीण भागात जनजागृती करून उपकम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केलेत. तसचे दिपक भारूडे (सामोडे) दिपक सुर्यवशी(बोडकी, खडी) या ठिकाणी जनजागृती कार्य केले. त्याच बरोबर कु. रोशनी राऊत (करंझटी) अजय भदाणे (पिंपळनेर)यांनी देखील सक्रीय सहभाग नोंदवुन जन जागृती केली.

३) कर्म.आ.मा.पाटील महाविद्यालय, पिंपळनेर आणि जे.के.शहा आदर्श कॉलेज निजामपुर यांच्या संयुक्त विद्यमाने ७ जुन ते २०२१ ते १३ जुन २०२१ या ८ दिवसाच्या कालावधीत योग शिबीराचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात आले. त्या वेळी महाविद्यालयातील रासेयो सहा.कार्य.अधिकारी व योग शिक्षक प्रा.वाय.एम. नांद्रे यांनी योग प्रशिक्षक म्हणुन उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे, सहा.कार्य.अधिकारी प्रा.प्रदिप सावळे, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक व नागरीकांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला.

५) दि.२४/६/२०२१ रोजी कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्याल, पिंपळनेर येथील रासेयो एककामार्फत वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांनी वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन संदर्भात मार्गदर्शन केले. तर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी प्रास्ताविक केले तर रासेयो सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे कार्यक्रमाला उपस्थितांचे आभार मानले. तसेच रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपन केले. कार्याप्रसंगी प्रा.कचरेश्वर राऊत, डॉ.मोरे, प्रा.कदम,डॉ.मस्के,डॉ.शिरसाठ व इतर प्राध्यापक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

६) २२ जुलै २०२१ रोजी कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने लाईफ स्टाईल ॲन्ड स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयासह ऑनलाईन चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे, सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. या प्रसंगी रासेयो सहा.कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक वाय.एम. नांद्रे यांनी कार्यक्रमातील प्रमुख पाहुण्याना परिचय करून कार्यक्रमात सहभाग नोंदविला

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर रासेयो एककाच वतीने २७ जुलै २०२१ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी निमित्ताने कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.एस.टी.सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी रीतीने आयोग करण्यासाठी प्रा.घरटे, प्रा.सावळे, प्रा.नांद्रे यांनी परीश्रम घेतले. या कार्यक्रमाला प्रा.राऊत, प्रा.तोरवणे, प्रा.मोरे, प्रा.बळसाणे व महाविद्यालयातील प्राध्यापक व इतर कर्मचारी तसेच रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

८) २८ जुलै २०२१ जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त शपथ :–

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथील रासेयो एककाच्या वतीने जागतीक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त पर्यावरणाचे संवर्धन, पशुपक्षी, झाडे लावणे या संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांनी आपले विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी विद्यार्थ्यांना निसर्ग संवर्धनाची शपथ दिली तर रासेयो सहा.कार्य.अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी निसर्ग संवर्धना संदर्भात स्वयंसेवकांना निसर्ग संवर्धन विषयी माहिती दिली.

९) १ ऑगस्ट २०२१ रोजी रासेयो एककातर्फे महाविद्यालयात लोकमान्य टिळक व आण्णभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांनी भुषविले तर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणुन रासेयोचे सहा.कार्यक्रम आधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी कार्यक्रमाच्या वेळी लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे यांच्या जिवन पटावर प्रकाश झोत टाकला. या वेळी कार्यक्रमाचे प्रस्तावना व सुत्र संचालन प्रा.चंद्रकांत घरटे यांनी केले या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन प्रा.कदम उपस्थित होते. तसेच रासेयो स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

१०) रासेयो तर्फे पानखेडा येथील टेकडीवर वृक्षारोपन कार्यक्रम पिंपळनेर जवळ पानखेडा गावाजवळील टेकडीवर आमच्या महाविद्यालयातील रासेयो एकका तर्फे बिजारोपन व वृक्ष लागवड कार्यक्रम करण्यात आले या वेळी रासेसो स्वयंसेवकांनी कडु नींब, चिंच, सिताफळ, रामफळ इ. देशी झाडांच्या बियांची लागवड करण्यात आली. तसेच वड, पिंपळ इ.देशी झाडांचे वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी वनविभागाचे अधिकारी श्री.माळके साहेब, पानखेडा गावातील प्रतिष्ठित नागरीक श्री. सदाशिव घरटे, श्री.सचिन देशमुख व रासेयो स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यास प्रा.प्रदिप सावळे, प्रा.चंद्रकांत घरटे व इतर सहकारी प्रयत्नशील होते.

११) दि. ४ आक्टो. २०२१ :–

जैवविविधता टिकविण्याच्या दृष्टीने पिंपळनेर वन विभागामार्फत परिसर वन्यजिव सप्ताह साजरा करण्यात आला. या वेळी निसर्ग मित्र समिती, पिंपळनेर चे उपाध्यक्ष व रासेयो चे सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे, पिंपळनेर विभागाचे आर.एफ.ओ. श्री.माळके साहेब, निमित्त समिती पदाधिकारी यानी कासार येथे कार्यक्रम आयोजीत करून उपस्थिताना जागृती घडवुन आणली. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रदिप सावळे यानी करून दिला.

१२) दि. ८ आक्टो.२०२१ –

.न्यजिव सप्ताह निमित्त पिंपळनेर येथे कार्यक्रम येथील कर्म.आ.मा.पाटील विद्यालयात पिंपळनेर वनविभागामार्फत वन्यजिव सप्ताह निमीत्त वन्य--जिव--रक्षण व वनसंवर्धन या विषयावर श्री.अमित खरे यांचे व्याख्यान वनविभाग पिंपळनेर तर्फे आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला रासेयोचे अधिकारी तसेच निसर्ग मि. समितीचे उपाध्यक्ष, सहसचिव प्रा.प्रदिप सावळे, प्रा.चंद्रकांत घरटे व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

१३) दि.१३ नोव्हें. पिंपळनेर वनविभागातर्फे लाटीपाडा धरणावर कार्यक्रम आयोजन :--

वनविभाग पिंपळनेर तर्फे, वनपक्षि सप्ताह ५ नोव्हें.२०२१ ते १२ नोव्हें.२०२१ या कालावधीत साजरा करण्यात आला. यावेळी लाटीपाडा धरणावर विदयार्थ्यासमोर प्रमुख वक्ते म्हणुन रासेयोचे सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप साबळे यांनी विदयार्थ्यांना कार्यक्रमाप्रसंगी मानवा प्रमाणेच पक्षांना देखिल जिवन जगण्याचा अधिकार आहे. असे ते म्हणाले. सदर कार्यक्रमाला वनविभागाचे माळके साहेब, वनविभागाचे सर्व कर्मचारी,पत्रकार, प्रा.घरटे व विदयार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

१४) ११ ऑगस्ट २०२१ :--

महाविदयालयात विदयापीठ नामविस्तार दिनानिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या स्मृतीस उजाळा दिला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे आणि प्रा.प्रदिप सावळे प्रयत्नशील होते. या कार्यक्रमाला डॉ.पेटारे, डॉ.मोरे, डॉ.शिरसाठ, लक्ष्मीकांत पवार, संदीप अमृतकार व इतर कर्मचारी उपस्थित होते.

१५) एन.एस.एस.एकक पिंपळनेर, तर्फे विविध ऑनलाईन स्पर्धाचे आयोजन :--

कर्म.आ.मा.पाटील महाविदयालय, पिंपळनेर रासेयो एककातर्फे भारतीय स्वातंत्र्य दिन, विदयापीठ नामविस्तार आणि विदयापीठ स्थापना दिनानिमित्त विविध ऑनलाईन स्पर्धा घेण्यात आल्या त्यात निबंध स्पर्धेत गावित मनिषा पवार भाग्यश्री, रोकडे नेहा,खिल्लारी पंकेश यांना प्रथम,द्वितीय,तृतीय व उत्तेजनार्थ बक्षिस कंमांक देण्यात आले. तर चित्रकला स्पर्धेत चौधरी कविता प्रथम, गावित मनिषा द्वितीय, निकुम पवन तृतीय व गावित चंद्रकला हिला आयोजनार्थ क्रमांक देण्यात आले. तसेच रांगोळी स्पर्धेत चौधरी कविता प्रथम गावित मनिषा द्वितीय, पवार भाग्यश्री तृतीय असे क्रमांक देण्यात आले. या सर्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रासेयो कार्य.अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी परीश्रम घेतले. तसेच महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे, प्रा.राउत, प्रा.तोरवणे यशवे विदयार्थ्यांचे कौतुक केले.

१६) आंतरराष्ट्रीय युवा दिन, एडस जनजागृती व अवयव दान जनजागृती कार्यक्रम :--

रासेयो विभाग पिंपळनेर व विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रा.डॉ.एस.टी.सोनवणे व वैद्यकिय अधिकारी डॉ.मोहने यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय युवा दिन, एड्स व अवयव कोविड--१९ जनजागृती करण्यासाठी ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी रासेयो स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामीण रूग्णालयातील ICTC विभागाचे सल्लागार श्री.हेमंत जाधव व त्यांच्या सहकारी

लताताई गवरे यांनी रासेयो स्वयंसेवकसंना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.चंद्रकांत घरटे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय सहा.कार्यकारी अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी करून दिला. सदर ऑनलाईन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.कन्हरेश्वर राउत, डॉ.नितीन सोनवणे यांचे मोलाचे सहकार्य प्राप्त झाले.

१७) इंडीया फ्रिडम रनचे आयोजन :—

सप्टें २०२१ कर्म.आ.मा.पाटील वरीष्ट महाविद्यालय, पिंपळनेर येथे रासेयो एकका मार्फत प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली "इंडीया फ्रिडम रन" चे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा.चंद्रकांत घरटे, प्रा.प्रदिप सावळे,प्रा.योगेश नांद्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदरच्या इंडीया फ्रिडम रन या कार्यक्रमात एकुण २७ रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.वाय. एस.भोगे, प्रा.राउत, डॉ.नितीन सोनवणे, श्री.गवळी, श्री. शेलार, अमृतकर, कुवर यांनी देखील स्वयंस्फुर्तीने या कार्यक्रमात भाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

१८) वरीष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथील रासेयो एकका मार्फत २ ऑक्टो २०२१ रोजी म. गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्ताने "अहिंसा दिन" महाविद्यालयात प्राचार्य डॉ.सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यावेळी रासेयो एककाचे सहा.कार्यक्रम अधिकारी व इतिहास विभागाचे प्रा.प्रदिप सावळे यांनी "स्वच्छते संदर्भात महात्मा गांधीचे विचार" या संदर्भात स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तसेच "तसेच मूर्ती लहान परंतु किर्ती महान" असे भारतीय माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार रासेयो अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी केले. सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा.[illegible] उपस्थित होते. तर शिक्षकेतर कर्मचारी श्री.रवि शेलार व रासेयो स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

१९) २५ ऑक्टो २०२१ "मिशन युवा स्वास्थ्य" मोहिमे अंतर्गत रासेयो विभागामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे लसीकरण

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, [illegible] यांच्या संयुक्त सहकार्याने कोविड १९ प्रतिबंधासाठी दि.२५ ऑक्टो २०२१ रोजी महाविद्यालयात लसीकरण शिबीराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कोविड १९ प्रतिबंधक लस घ्यावी असे आवाहन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना करून महाविद्यालयात NSS एककामार्फत लसीकरण शिबीर आयोजीत करण्यात आले होते. या शिबीरात एकूण ६० विद्यार्थ्यांना पहिला [illegible] डोस देण्यात आला. या [illegible] महाविद्यालयाचे [illegible] रासेयो अधिकारी प्रा.घरटे, प्रा.सावळे [illegible]

[illegible]

ाध्यापक आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.घरटे, प्रा.नांद्रे, प्रा.सावळे यांनी सदर शिबीराचे आयोजन करून विदयार्थ्यांमध्ये लसिकरणासंदर्भात जनजागृती केली. तिसरे शिबीर कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविदयालय, पिंपळनेर येथे दिनांक २५/११/२०२१ रोजी महाविदयालयातील रासेयो विभागामार्फत कोविड–१९ प्रतिबंधक लसिकरणाच्या तिसऱ्या शिबीराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबीरात एकुण ७६ विदयार्थी व पालक यांनी लसिकरणाचा पहिला/दुसरा डोसचा लाभ घेतला. या वेळी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे, प्राथ. आरोग्य केंद्र सामोडे–२ चे श्री.प्रविण पाटील,श्रीमती सगळे, श्रीमती चव्हाण अंगणवाडीच्या आशाताई तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.घरटे,प्रा.सावळे तसेच महाविदयालयातील डॉ.सोनवणे, प्रा.राउत, प्रा.डॉ.शिरसाठ व इतर महाविदयालयातील सर्व प्राध्यपकांचे सहकार्य लाभले.

२२) महाविदयालयात दि.१२/८/२०२१ रोजी शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०२१/प्र.क्र/५३/विशि.३ दि.२३/७/२०२१ आदेशान्वये आमच्या महाविदयालयात प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे, कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.एन.घरटे,सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.एम.सावळे, प्रा.नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळात पुढील विदयार्थ्यांचा समावेश करण्यात आला. त्यात १) कु.गावित मनिषा केशव २) खिल्लारी पंकेश सुभाष ३) शिरसाठ शेखर आप्पा

२३) दि.२१ जुन २०२१– आंतरराष्ट्रीय योगा दिवस :–

कबचौ.उमवि/१४रासेयो/६६/योगदिन/५२/२०२१ या संदर्भीय पत्रान्वये आमच्या महाविदयालयाच रासेयो एककमार्फत २१ जुन २०२१ हा आंतरराष्ट्रीय योगा दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. योगा दिनाच्या निमित्ताने महाविदयालयात प्रमुख अतिथी म्हणुन पिंपळनेर पोलिस स्टेशनचे ए.पी.आय.ता.साकी साळुंके साहेब उपस्थित होते. रासेयो सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.नांद्रे यांनी योगासनांची प्रात्यक्षिके करून मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.एन.घरटे, सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.एम.सावळे नियोजन व संयोजन केले तर विदयार्थी विकास विभागाचे डॉ.एस.पी.खोडके यंनी सुत्रसंचालन व आभार मानले. या कार्यक्रमात महाविदयालयातील विदयार्थी व कर्मचारी मोठया संख्यने उपस्थित होते.

२४) कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविदयालय, पिंपळनेर येथील रासेयो विभागातर्फे सरदार वल्लभभाई पटेल जयंती, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. या वेळी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे यांच्या हस्ते या महाविभुतीच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले. तसेच महाविदयालयातील इतिहास विषयाचे प्राध्यापक आणि रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी या दोन्हींनी महान व्यक्तींच्या विचारांना उजाळा दिला. तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी केले. या कार्यक्रमाला रासेयो स्वयंवेवक आणि महाविदयालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

२५) रासेयो विभाग वरिष्ठ महाविदयालय,पिंपळनेर यांच्या मार्फत जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त पर्यावरणाचे संवर्धन पशु–पक्षांचे रक्षण, झाडे लावणे या संदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी रासेयो अधिकारी प्रा.सी.एन.घरटे यांनी उपस्थित रासेयो स्वयंसेवकांना निसर्ग संवर्धनाची शपथ दिली तसेच रासेयो सहा.

कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी निसर्ग संवर्धनाबाबत उपस्थित विदयार्थ्यांना मार्गदर्शन करून आभार मानले. या वेळी डॉ.पेटारे, डॉ.वाय एस.मोरे, प्रा.कदम,डॉ. मस्के, श्री.कैलास जिरे व रासेयो स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

२६) पिंपळनेर वरिष्ठ महाविदयालयातील रासेयो एककमार्फत परिसर स्वच्छता व कोरोना मुक्ती शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि.१५ ऑगस्ट २०२१ व विदयापीठ नामविस्तार दिवस दि.११ऑगस्ट याचे औचित्य साधुन रासेयो एककाच्या स्वयंसेवकांना कोरोना मुक्तींची शपथ प्रा.चंद्रकांत घरटे यांनी उपस्थितांना दिली. तर प्रा. प्रदिप सावळे यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून आभार मानले. या कार्यक्रमाला महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी प्रा.नांद्रे, डॉ.यशवंत मोरे, प्रा.कदम, प्रा.खरात,डॉ.तलवारे व स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

२७) वरिष्ठ महाविदयालय, पिंपळनेर येथील रासेयो विभागामार्फत दत्तकगांव बोपखेल, ता.साक्री येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी ग्रामपंचायत वाचन कटयाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी महाविदयालयाच्या माजी विदयार्थींनी आणि बोपखेल गावाच्या सरपंच श्रीमती. समित्रा राउत या अध्यक्षस्थानी होत्या. तर प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांच्या हस्ते वाचन कटटयाचे ५० पुस्तके देवून उद्घाटन करण्यात आले. या वेळी तलाठी श्री.दिलीप चव्हाण, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री.पाच्या गावित, सामाजिक कार्यकर्ते

नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

२८) दि.२३/०१/२०२२

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथील रासेयो विभागामार्फत नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करण्यात आली. या वेळी महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्राध्यापक व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी या वेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमीत्त आपले विचार स्वयंसेवकांसमोर मांडले. यावेळी कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी मानले या वेळी शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

२९) ७ जाने.२०२२ :– सिंधुताई सपकाळ यांना श्रध्दांजली

रोजी कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथील रासेयो विभागतर्फे अनाथांची आई सिंधुताई सपकाळ यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.एम.सावळे यांनी सिंधुताईच्या जीवनाविषयी उपस्थितांना माहिती दिली. या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. शिरसाठी, डॉ.बी.सी.मोरे, डॉ.बी.सी.मोरे,डॉ.वाय.एस.मोरे,डॉ.खरात,डॉ.मस्के, प्रा. बळसाने,प्रा.नांद्रे, प्रा.तोरवणे, प्रा.जाधव, प्रा.गवळी, प्रा.बसावे व विद्यार्थी स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार कार्यक्रम अधिकारी प्रा.सी. एन.घरटे यांनी मानले.

३०) "राष्ट्रीय युवक दिवस साजरा" दि.१२/१/२०२२

राष्ट्रीय सेवा योजना विभाग,

वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

आज दि.१२ जानेवारी २०२२ रोजी कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथील रासेयो विभागातर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकांनद यांची जयंती साजरी करणत आली. या प्रसंगी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे व रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्राध्यापक प्रदिप सावळे यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या राजमाता जिजाऊ संदर्भात आपले विचार प्रकट केले. तसेच 'राष्ट्रीय युवक' दिना निमित्ताने स्वामी विवेकांनदाच्या संदर्भात बोलतांना ते म्हणाले की, भारतातील प्रत्येक तरूण तरूणींनी स्वामी विवेकांनंदाचे विचार आत्मसात केल्यास संपूर्ण जगाचे नेतृत्व करण्याची ताकद भारतीयांमध्ये आहे. यावेळी कार्यक्रमाला प्रा.के. डी.कदम, प्रा.डी.बी.जाधव उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी श्री.गवळी, श्री.कैलास जिरे, श्री.शेलार, श्री.अमृतकर, श्री.कुवर रासेयो स्वयंसेवक विद्यार्थीनी कु.राऊत, कु.बर्डे, कु.सोनवणे या देखील उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमाचे आभार प्रा.चंद्रकांत घरटे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.चंद्रकांत घरटे, प्रा.प्रदिप सावळे हे रासेयोचे अधिकारी प्रयत्नशिल होते.

३१) दि.२६/१/२०२२

पिंपळनेर महाविद्यालयात "राष्ट्रीय मतदार दिवस" साजरा

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथील राष्ट्रीय सेवा योजना एककामार्फत "राष्ट्रीय मतदार दिवस" महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. प्रा.प्रसंगी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक डी.बी.जाधव यांनी आपले विचार प्रकट केले. यावेळी ते म्हणाले १८ वर्षे वय पूर्ण झालेल्या तरूण—तरूणींनी मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे. लोकशाही सुदृढ करण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे. असे ते म्हणाले. तसेच रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी उपस्थितांना मतदार दिनाची शपथ दिली.

३१) "वरिष्ठ महाविद्यालया, पिंपळनेर येथे प्रजासत्ताक दिवस साजरा"

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे संचालक बापुसाहेब श्री.हिरामण गांगुर्डे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी ते म्हणाले की, देश पारतंत्र्यामध्ये असतांना देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य देशभक्ताचे योगदान आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशावर असंक्ष्य वेगवेगळी संकटे आली त्यावर भारतीयांनी यशस्वीरित्या मात केलेले आहेत. असे असले तरी तरूणांनी देशासाठी सदैव जागृत राहणे गरजेचे आहे. असे ते म्हणाले.

या प्रसंगी मतदार जागृती निमित्ताने महाविद्यालयातील राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक डी.बी.जाधव यांनी आपले विचार प्रकट केले त्यावेळी ते म्हणाले भारतातील लोकशाही मजबुत करावयाची असेल तर १८ वर्षे वरिल वयोटातील प्रत्येकान

मतदानाचा पवित्र अधिकारी बजाऊन सुशिखित , प्रामाणिक, स्वच्छ आणि कार्यक्षम उमेदवारांनी मतदार करून आपला हक्क बजवावा असे ते म्हणाले.

या प्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी मतदार जागृतीची उपस्थितांना शपथ दिली. तसेच या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन, प्रा.डॉ.खोडके यांनी केले तर कार्यक्रम उपस्थितांचे आभार प्रा.प्रदिप सावळे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधु व प्राध्यापकेतर बंधु भगिनी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅलेट व इतर विद्यार्थी उपस्थित होते.

३२) दि.०२/०२/२०२२

वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथे कोवीड–१९ प्रतिबंधक बुस्टर डोस शिबीराचे आयोजन–

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथील रासेयो विभाग आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, सामोडे–२ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांच्यासाठी दि.०२/०२/२०२२, वार बुधवार रोजी कोवीड–१९ प्रतिबंधासाठी बुस्टर डोस शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीराच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे हे होते. या शिबीराला एकुण १९ महाविद्यालयातील प्राध्यापक/प्राध्यापकेतर बंधु–भगिणींना बुस्टर डोस देण्यात आला. या शिबीराचे आयोजन महाविद्यालयातील रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे, प्रा.योगेश्वर नांद्रे यांनी केले होते. या प्रसंगी प्राथ. आरोग्य केंद्र सामोडे–२ येथील आरोग्य सेवक श्री.प्रविण पाटील, श्रीम.सगळे,श्रीम. जगताप, श्रीम.माळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ.बी.डी.मोरे, डॉ.वाय.एस.मोरे, डॉ.मस्के, प्रा.तोरवणे, डॉ.पेटारे, डॉ.शिरसाठ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते आभार प्रा.प्रदिप सावळे यांनी मानले.

या प्रसंगी कासारे येथील

समाजिक कार्यकर्ते श्री.संजय भटू देसले हे उपस्थित होते.आंतरराष्ट्रीय किर्तीचे छत्रपती शिराय असे प्रतिपादन वक्ते प्रा.प्रदिप सावळे यांनी केले.

PTO

३३) १९/०२/२०२२

पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी संचलित कर्म.आ.मा.पाटील माध्य.व उच्च माध्य. तसेच वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर तसेच रासेयो एकक वरिष्ठ महाविद्यालय पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे हे होते. तसेच माध्य.व उच्च माध्य.विद्यालयाचे प्राचार्य श्री.ए.बी.मराठे, उप प्राचार्य प्राध्यापिका श्रीमती माळी,श्री.नगराळे सर, श्रीमती जोशी मॅडम व्यासपिठावर उपस्थित होत्या.

छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांच्या ३९२ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून वरिष्ठ महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनांचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदिप सावळे यांनी मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराजांचा पाठीराखा या संदर्भातील इतिहास उलगडला. तसेच गनिमी काव्याचा अवलंब करून दिलेर खान, शाहिस्ते खान, कारतलब खान याचा बंदोबस्त केला. थोडक्यात शिवाजी महाराज हे एक आंतरराष्ट्रीय सेनापती होते असे ते म्हणाले तरूणांनी शिवाजी महाराजांच्या आदर्श डोळयासमोर ठेवावा. असे आवाहन त्यांनी त्यावेळी ते म्हणाले शिवाजी महाराज हे सर्व धर्मियांबरोबर घेऊन चालणारे महापुरूष होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एस.कोठावदे सर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो एककाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत घरटे, रासेयो सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.योगेश नांद्रे हे प्रयत्नशील होते. कार्यक्रमाला मोठया संख्येने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उदधारी–प्राचार्य एस.टी.सोनवणे

३४) – कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथे दि.८ मार्च २०२२ जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी.सोनवणे यांनी आपल्या भाषणातून ते म्हणाले की, आज स्त्री पुरूषाच्या बरोबरीने काम करीत आहे. हे केवळ स्त्रियांना दिलेल्या शिक्षणामुळे शक्य होत आहे. तसे मधल्या काळात स्त्रीयांची–पुरूषांच्या तुलनेने कमी झाली होती. ती आता बऱ्यापैकी वाढलेली आहे. असे ते म्हणाले यावेळी कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयातील रासेयोच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रबोधन घडुन यावे म्हणुन कर्म.आ.मा. पाटील माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्राध्यापिका श्रीमती एस.बी.माळी मॅडम प्रमुख वक्त्या म्हणुन उपस्थित होत्या. त्या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्या म्हणाल्या की, स्त्री–पुरूष समानता जरी प्रस्तुत समाजात बऱ्यापैकी रूजत असली तरी तृतीय पंथीयांना देखिल मानुसकीची वागणुक दिली गेली पाहिजे. तसेच त्यांनी आपल्या मनोगतातून जागतीक पातळी पासुन ते ग्रामीण पातळी पर्यंतच्या कर्तृत्ववान स्त्रीयांनी उदाहरणे देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर पाहुण्यांचा परिचय व आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रदिप सावळे यांनी मानले. या कार्यक्रमाला व्यासपीठावर प्रा.डॉ.शिरसाठ, डॉ.बी.सी. मोरे हे उपस्थित होते तर या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व रासेयोचे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमास प्रा.राउत, प्रा.तलवारे, प्रा. लोखंडे, प्रा.जाधव, डा.पस्के, प्रा.बळसाणे, प्रा.वगावे, प्रा.गवळे हे उपस्थित होते सदर

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत घरटे, प्रा.प्रदिप सावळे विशेष प्रयत्नीशल होते.

Principal Programme Officer

National Service Scheme

K.A.M. Patil Arts,Comm. & Kai.Annasaheb N.K.Patil Science Sr.College Pimpalner Tal.Sakri Dist.Dhule